**प्रेसनोट दिनांक ०७/०६/२०१९**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.

## चोरीस गेलेली फॉर्च्युनर गाडी दत्तवाडी पोलीसांनी जोधपुर,राजस्थान येथुन आरोपीसह घेतली ताब्यात

दि.२३/०१/२०१९ रोजी मोरेश्वर सभागृहा जवळ,सिंहगड रोड,पुणे येथुन नगरसेवक दिपक अशोक पोटे यांची टोयाटो कंपनीची फॉर्च्युनरगाडी अज्ञात व्यक्तीन चोरुन नेल्याची तक्रार दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे नोंद करण्यात आलेली होती. या गाडीचा शोध घेण्या करीता दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासपथकाचे पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ हे तपास करत होते. तपास पथकाच्या वेगवेगळ्या टिम तयार करुन त्या वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्यात आल्या परंतु यापुर्वी आलेल्या अनुभवानुसार राजस्थान, गुजरातसिमेवर अवैधधंद्याकरीता अशा रितीने मोठ्यागाड्या चोरी झाल्याचे प्रकार झाले असल्याने त्यानुसार राजस्थान, पंजाब, गुजरात येथील पोलीसांच्या संपर्कात वेळोवेळी राहिल्याने राजस्थान मध्ये या चोरीस गेलेली गाडी जोधपुर येथील लुणी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक कुलदिप संकपाळ, पोलीस नाईक सुधीर घोटकुले व सोमेश्वर यादव यांनी तेथे जावुन माहिती घेतली असता आरोपी नामे हिरामण ऊर्फ हरिष चिमणाराम जाट वय २२ वर्षे रा. कोलु महेचा ता.बायतु जि.बाडमेर, राजस्थान याने चोरली असल्याचे समजले. सदरची गाडी त्याच्या ताब्यातुन जप्त करण्यात आली आहे.

आरोपी हिरामण ऊर्फ हरिष चिमणाराम जाट वय २२ वर्षे रा. कोलु महेचा ता.बायतु जि. बाडमेर, राजस्थान याला अटक करुन मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आर.आर. भळगट कोर्ट यांच्या समक्ष हजर केलेव सदर अटक आरोपी याच्याकडे त्याच्याबरोबर वरील गाडी चोरी करण्यास असलेल इतर आरोपींचा शोधघेणे,आरोपींनी गाडीचा मुळ क्रमांक बदलुन बनावट नंबर टाकला असल्याने त्याबाबत तपास करणे आहे. तसेच पुणे शहर व पिंपरीचिंचवड येथे अशा प्रकारे इतर चोरीस गेलेल्या फॉर्च्युनर, इनोव्हा अशा हायएंड गाड्या बाबत तपास करणे या करीतात्याची०५ दिवस पोलीसकोठडी मंजुर करण्यात आली आहे.

वरील कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ, पोना सुधीर घोटकुले, सोमेश्वर यादव, महेश गाढवे, अमोल लोहार यांनी सहभाग घेतला होता.

(देविदासघेवारे)
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर.